
प्रिती.. तुझी नी माझी
- अनिकेत समुद्र

निखिल सकाळी ६.३० ला ऑफिसपाशी पोहोचला. थोडीफार लोक आधीच येऊन थांबली होती. एक-एक करत सगळे येऊन निघायला ७.३० वाजले. इतके दिवस प्रचंड काम केल्यानंतर शेवटी तो दिवस येऊन ठेपला होता. आज ऑफिसची ट्रीप होती. एक आठवडा मस्त मौज करायची, कामाची कटकट नाही, तारखांचे गणीत नाही की मीटिंग्ज ची कंटाळवाणी बडबड नाही. आठवडाभर मस्त आराम आणि धिंगाणा.

गप्पा, गाणी, ओरडा-आरडी यामध्ये अलिबाग कधी आले कळलेच नाही. अथांग पसरलेला समुद्र किनारा पाहून सगळ्यांचाच प्रवासाचा थोडाफार आलेला शीण निघून गेला. आणि राहण्यासाठी घेतलेले हॉलिडे-रिसॉर्ट पाहून तर त्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही. सगळेजण आनंदाने बेभान झाले होते.
संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर दंगा-मस्ती, पाण्यात डुंबून सगळेजण हॉटेलवर परतले. खोलीतून आवरून बाहेर पडतात-न-पडतात तोच त्यांच्या कानावर जोरजोरात वाजणाऱ्या गाण्यांचा आवाज पडला. हम्म.. डि.जे आहे तर.. निखिल स्वतःशीच बडबडला.

पुढचा १ तास पूर्ण धिंगाणा घालण्यात गेला. नवीन हिंदी-इंग्लिश गाणी, रिमिक्स यावर सगळ्यांची पावलं नुसती थिरकत होती. शरीरातून घामाच्या धारा वाहायला लागल्या तसे एक एक जण कमी होऊ लागले. पण निखिल मात्र पूर्ण जोषांत होता. इतक्या दिवसाचा मानसिक थकवा घालवायला नाचणे हाच योग्य उपाय होता, आणि नृत्य तर निखिलचा छंदच मग तो कसला थांबतोय. हळू हळू करत गर्दी कमी होत गेली आणि निखीलला ती दिसली. Blue Stripe चा Top, Black Skirt, सोनेरी कलर केलेले केस, पाणीदार डोळे.. आपल्या मैत्रिणींबरोबर देहभान विसरुन ती नाचतच होती. पण थोड्यावेळात तिच्या मैत्रिणी पण थकल्या आणी शेवटी floor वर उरले फक्त निखिल आणी 'ती'.

दोघेही अगदी बेभान होऊन नाचत होते. आणि अचानक काय होतेय हे कळायच्या आतच 'ती' निखिलच्या अंगावर कोसळली. दोन मिनिट कुणालाच काही कळले नाही काय झाले ते. निखिलही पुरता भांबावून गेला. थोड्याच वेळात तिचे मित्र-मैत्रिणी धावत आले, त्यांनी तिला सावरले आणि बाजूला घेऊन गेले. निखिलही मग आपल्या मित्रांमध्ये जाऊन जेवायला बसला. पण त्याचे सगळे लक्ष 'त्या'च टेबलाकडे होते. 'ती' आता बऱ्यापैकी सावरली होती. तिच्या मैत्रिणी तिला ज्यूस, पाणी वगैरे देत होत्या. 'ती' मात्र आपला चेहरा तळहाताने झाकून रडत होती.

थोड्यावेळाने 'ती'च्या मैत्रिणी तिला घेऊन निघून गेल्या. निखिलही मग जेवण उरकून आपल्या रूम मध्ये निघून गेला. दिवसभराचा थकवा आणि रात्रीचा नाच यामुळे बिछान्यात पडल्यापडल्या झोप लागेल ही निखिलची अपेक्षा फोल ठरली. डोळे मिटले तरी संध्याकाळचा तो प्रसंग त्याच्या डोळ्यासमोरून जात नव्हता. तिचा तो सुंदर चेहरा, संगीताच्या तालावर लयबद्ध नाचणारे तिचे शरीर, आणि अचानक अंगावर वीज कोसळावी आणि अंगाला प्रचंड धक्का बसावा असा तिचा त्याला झालेला तो स्पर्श. छे!! प्रयत्न करूनही झोप लागेना तसा निखिल बिछान्यातून उठला आणि रूमच्या बाहेर पडला. हवेतला गारवा वाढला होता. बाहेर बऱ्यापैकी सामसूम होती.

रिसॉर्ट मध्ये एका कोपऱ्यात शेकोटी पेटलेली दिसली म्हणून निखिल तिकडे वळला. जवळ गेल्यावर त्याला दिसले की त्याच्या अंगावर कोसळलेली 'ती' आणि तिची एक मैत्रीण एकमेकींशी बोलत होत्या. निखीलने तेथीलच एका झाडाचा आडोसा घेतला आणि तो त्यांचे बोलणे ऐकू लागला. 'ती'ची मैत्रीणच बऱ्याच वेळ बोलत होती.

“For God sake Shreya, I don’t belive you were drunk. काय झालेय तुला? Control Yourself. जे झाले ते बरेच झाले नाही का? गेली १० वर्ष जे चालले होते ते शेवटी संपले. You should feel better now.”
बराच वेळ शांततेत गेला. निखिल स्वतःशीच काय झाले असेल याचा विचार करत होता. “May be break-up झाला असेल”, निखिल स्वतःशीच पुटपुटला. तेवढ्यात त्याच्या कानावर तिचा, श्रेयाचा, आवाज आलाः

“जब भी किसीको करीब पाया है
कसम खुदा की वही धोखा खाया है
क्यो दोष देते है हम काटों को
जख्म तो हमने फुलोंसे पाया है”

व्वा व्वा..निखिल ला जोरात दाद द्यावीशी वाटली पण त्याने स्वतःला सावरले. एक तर आपण लपुन ओळख नसतानाही कुणाचे तरी बोलणे ऐकतोय, आणी ही वेळ ही योग्य नाही कुणाच्या शायरीला दाद देण्याची असा विचार करुन आपल्या रूम वर परतला.

रात्री झोप नीट अशी लागलीच नाही. रात्रभर तो काय झाले असेल याचाच विचार करत राहिला. सकाळी जाग आली तेव्हा निखिल एकदम फ्रेश झाला होता. समुद्रकिनाऱ्यावर जाऊन मस्त जॉगींग करायचा विचार त्याच्या मनात येऊन गेला. मग पायात शूज अडकवून निखिल ६.३० लाच शेवटी बाहेर पडला. Canteen मधून फ्रेश लाईम ज्यूस पिऊन निखिलने समुद्र किनारी धाव घेतली. सूर्योदय अजून व्हायचा होता. निखीलने शूज काढून ठेवले. पायाला गार मातीचा स्पर्श सुखावत होता. पायावर समुद्राच्या लाटा झेलत निखीलने दीर्घ श्वास घेतला आणि धावायला सुरुवात केली. समुद्राचे त्याला फार कौतुक वाटे. एवढा मोठा अथांग समुद्र, पण त्याला त्याच्या मोठेपणाच अजिबात गर्व नाही. तुम्ही कधीही त्याला भेटायला या, तो तुम्हाला त्याच जागी कधीही भेटेल. तुम्ही त्याच्या जवळ गेलात की तोच धावत तुमच्या भेटीला येईल आणि तुमच्या पायावर लोळण घालेल. निखिल आपल्याच विचारात धावत होता आणि त्याला श्रेया दिसली. समुद्राच्या पलीकडे काय आहे हे शोधण्याच्या प्रयत्नात असलेली व्यक्ती कशी दिसेल तशीच नजर लावून ती कुठेतरी बघत बसली होती. पुढे जावे की इथूनच मागे फिरावे? पुढे गेलोच तर ओळख दाखवावी का दुर्लक्ष करून जावे अशा विचारात निखीलने आपला वेग कमी केला. तेवढ्यात श्रेयाचे लक्ष निखीलकडे गेले. दोघांची नजरानजर झाली. निखीलने तिच्याकडे बघून एक मंद हास्य केले.

तिच्या चेहऱ्यावर मात्र शून्य भाव.!!

निखीलला एक क्षण आपण Bowling खेळतोय असेच वाटले. Bowl तर टाकलाय आता स्ट्राईक होणार का कडेच्या गटर मधून जाऊन Miss Hit होणार अशा विचारातच जसे काही क्षण जातात तसेच हे क्षण त्याला वाटले आणि अचानक श्रेयाच्या चेहऱ्यावर मंद हास्याची एक लकेर उमटली. निखीलला बघून ती जरा सावरून बसली.

“Hi !!”, निखिल
“Hi !!” , श्रेया
“You Okay??”, निखिल
“हम्म. !!” श्रेया

निखीलला पुढे काय बोलायचे हेच समजेना म्हणून मग त्याने आपला वेग वाढवला आणि पळायला सुरुवात केली. तेवढ्यात श्रेयाने हाक मारली, “एक मिनिट..!”
निखिल जागच्या जागी थबकला. मागे वळून पाहिले तेव्हा श्रेया उठून त्याच्याच दिशेने येत होती. नुकताच सूर्योदय होत होता. सूर्यांच्या कोवळ्या किरणांत तिचे केस अधिकच सोनेरी भासत होते. चेहऱ्यावर आलेल्या केसांच्या बटा वाऱ्याच्या झुळकीने हलकेच उडत होत्या. त्या सावरताना हातातील ब्रेसलेटची किणकीण त्याला समुद्राच्या घनगंभीर आवाजात सुद्धा ऐकू येत होती.

“श्रेया !!”, तिच्या आवाजाने तो भानावर आला..
“अम्मं??” निखिल..
“श्रेया..!! माझे नाव !” असे म्हणत तिने आपला हात पुढे केला.
“Ohh.. निखिल” असे म्हणून निखीलने आपला हात तिच्या हातात मिळवला.

तिच्या स्पर्शाने आपल्या पायाखालची वाळू समुद्राच्या लाटेने सरकते आहे? का आपल्याला तसा भास होतोय ! हेच निखीलला कळेना.

“Thanks, and sorry about yesterday”, श्रेया.
“Oh.. Don’t be, it was a reflex action”, निखिल
“Awee, if your reflexes were bad, i would have fallen!!”, असे म्हणून श्रेया हसायला लागली.

एक सेकंद निखीलला आपल्याच बोलण्याची लाज वाटली. “काय मूर्ख आहे मी !”, असे स्वतःशीच बोलून निखिल तिच्या हसण्यात सामील झाला. नंतर ५-१० मिनिट इकडच्या तिकडच्या गप्पा मारून दोघांनीही एकमेकांचा निरोप घेतला.

निखिल रूम वर परतला तेव्हा फार खुशीत होता. त्याने आल्या आल्या आपल्या मित्रांना ओळखीबद्दल आणी झालेल्या सगळ्या गप्पा सांगितल्या.

अंघोळी वगैरे उरकून निखिल आणि त्याची गॅंग canteen मध्ये दाखल झाली. श्रेया आणि तिची मित्रमंडळी आधीच तिथे होती. आपल्या मित्रमंडळींसमोर आता आपण श्रेयाला ओळख देऊ वगैरे या विचारात निखीलने २-३दा श्रेयाच्या टेबलाकडे नजर टाकली पण तिचे लक्षच नव्हते. निखिल मात्र त्यामुळे फारच अस्वथ झाला. त्याची ही बैचैनी त्याच्या मित्रांच्या नजरेतून सुटली नव्हती. त्यांनी त्याची टर उडवायला सुरुवात केली. सगळेजण मुद्दामच श्रेयाला ऐकू जाईल अश्या आवाजात बोलू लागले.

“अर्रे निखिल.. हाय..! कधी आलास.. मी पाहिलेच नाही.”, एक
“काय निखिल Morning Walk ला एकटाच गेलास, आम्हाला उठवले पण नाहीस. आत्ता पासूनच दोस्तीत दरी पडायला लागलीये”, दुसरा
तिसराजण तर गाणंच म्हणत होता.. “कभी तो नजर मिलाओ, कभी तो करीब आओ....”
या सगळ्या गोंधळात चुकून एकाचा धक्का लागून काचेची डिश टेबलावरून खाली पडत होती, पण निखिलने ती

पटकन झेलली. मग काय विचारता लगेच एक जण म्हणालाच "निखिल तुझे reflexes खूपच strong आहेत हां.. नाहीतर ती खाली पडलीच असती.. i mean डिश रे.." आणी सगळे हसायला लागले.

निखिल ला तर मेल्याहून मेल्यासारखे झाले होते. कुठून आपण सगळे मित्रांना बोललो असेच त्याला वाटत होते. तो आपला मान खाली घालून खात होता. सहजच त्याने तिरक्या डोळ्याने श्रेयाकडे पाहिले. ती टेबलावरून उठतच होती, जाताना तिनेही निखीलकडे एकदा पाहिले आणि एक cute smile देऊन निघून गेली. तिच्या त्या एका छोट्याश्या स्माईल ने निखीलला मनावरचे किलोभराचे दडपण उतरल्यासारखे वाटले.

त्यानंतरचे १-२ दिवस असेच गेले. चोरटे कटाक्ष, येता जाता हळूच "Hi", भेटी-गाठी ,कधी सकाळी Morning Walk ला तर कधी मार्केट मध्ये. सगळे काही अनपेक्षित, तरीही ठरवल्यासारखे. एक दिवस निखीलने तो विषय काढलाच.

"श्रेया, what happened to you the other day? तब्येत ठीक नव्हती का?", निखिल.
"No. Something else, Its personal", श्रेया
"Oh. If you don't want to tell, its fine", निखिल depressed होऊन म्हणाला.

थोडा वेळ शांततेत गेल्यावर श्रेयाच म्हणाली, "Its not very easy when the relations break. Especially when you were tied to someone for more than years"
"Boyfriend?", निखिल आपल्या मनातील उत्सुकता लपवू शकला नाही.
"No, I don't have Boyfriend, Its my parents. They broke-off. I was going through tremendous pressure since last 10 years. They were having differences. That day Papa SMSsed' me that they have decided to seperate. निखिल खरंच खूप अवघड आहे हे सगळे समजणे.

चल पडी है कश्तियां समंदर, दूर है किनारा
इन मझदार से पुछ लेना क्या हाल है हमारा
बिखर जाते उस्सी दिन हम़ कही
अगर साथ ना मिलता हमे तुम्हारा"

निखिल तिच्या शायरीचा पुर्णपणे फॅन झाला होता. शायरीच्याच काय तो पूर्ण तिचाच फॅन झाला होता. तिचे हसणे, बोलणे, चेहऱ्यावर आलेली केसांची बट सावरणे, तिच्या हातातले ब्रेसलेट, ear-rings, तिला आवडणारे सिनेमे, TV Shows, Cartoons, Books, Songs सगळे काही त्याला आवडू लागले होते. खरं तर तिचं त्याला मनापासून, अगदी मनापासून आवडू लागली होती. तिचं Reserved राहणं, दहा वेळा विचार करून बोलणं त्याला impressive वाटायचे.

शनिवार त्याचा अलिबाग मधला शेवटचा दिवस होता, आणि त्या आधीच तो आपल्या प्रेमाचा 'ईझहार' तिला करणार होता. पण त्याचे मन त्याला साथ देत नव्हते. चार दिवसाच्या भेटीत निर्माण झालेली ही भावना हे प्रेमच आहे का निव्वळ आकर्षण हेच त्याला कळत नव्हते. आणी ते खरोखरच प्रेम असेल तरी, जे तो स्वतःच्याच मनाला पटवु शकत नव्हता, ते तो श्रेयाला तरी कसे पटवुन देणार होता? पण त्याच वेळेला त्याचे दुसरे मन त्याला

समजवायचे, "अरे वेड्या, तुला कळत कसे नाही. तिलाही तु आवडतोसच ना! तिचेही तुझ्यावर नक्कीच प्रेम असणार. आता कालचेच बघ ना, रात्री जेवायच्या वेळेला हॉटेलमध्ये कित्ती गर्दी होती आणी श्रेया आणी तिच्या मैत्रिणी तुमच्याच टेबल समोर जेवायला बसल्या. इथपर्यंत ठिक आहे रे,पण श्रेयाला बरोब्बर तुझ्यासमोरचीच जागा मिळाली हा काय निव्वळ योगायोग समजायचा? तुला असं नव्हतं वाटत का की जेवताना ती तुझ्याकडे बघती आहे? तिची ती अप्रतीम शायरी ती तिच्या मैत्रीणींनाच ऐकवत होती, का ते फक्त तुझ्याचसाठी होते? ह्या सगळ्या गोष्टींना काहीतरी अर्थ आहेच ना ! का त्याला फक्त मनाचे खेळ समजुन सोडुन द्यायचे?"

शुक्रवारी रात्रभर तो तिच्याशी काय बोलायचे, कसे बोलायचे याचाच विचार करत होता. मी असं म्हणंल तर ती काय म्हणेल, तिने असे म्हणलं तर आपण काय म्हणायचे याचा सगळा विचार त्याने आधीच करून ठेवला होता. दहा वेळा आरशात स्वतःच्याच छबी कडे बघत त्याने रंगीत तालीम केली होती आणि शेवटी त्याने श्रेयाच्याच Style मध्ये, तिला propose करायचे ठरवले होते. बस्स, त्याने एक कागद पेन ओढले आणि बराच विचार करून एक शायरी लिहिली:
" आंखे खुली हो तो चेहरा तुम्हारा हो,
आंखे बंद हो तो सपना तुम्हारा हो,
मुझे मौत का ड़र भी ना हो,
अगर कफन की जगह, दुपट्टा तुम्हारा हो."

शनिवारी पहाटेच निखिल उठून बसला. बाहेर अजूनही अंधारच होता. निखिल अत्यंत आतुरतेने ६.३० वाजण्याची वाट बघत होता. कधी एकदा ६.३० वाजतील आणि आपण jogging ला जाऊ, तिथे ती भेटेल मग आपण तिथेच तिला विचारू असा सगळा plan त्याने करून ठेवला होता. प्रत्येक क्षण त्याला युगा-युगा सारखा वाटत होता. शेवटी ६.३० वाजलेच. निघताना त्याच्या मनात आले, न जाणो श्रेया आलीच नाही तर? त्यापेक्षा आपणच तिला फोन करून बोलावून घेऊ. लगेचच त्याने intercom वरून तिच्या रूमचा नंबर फिरवला. बऱ्याच वेळ फोन वाजत राहिला पण कुणीच उचलला नाही. निखीलच्या मनात क्षणभर विचार येऊन गेला, "श्रेया आधीच तर समुद्रावर पोहोचली नसेल? Gosh!! She is also desperate to see me".

Positive thinking supresses your nervous feelings, and Nikhil was no exception to that. आनंदातच निखिल समुद्र किनारी पोहोचला. प्रत्येक क्षणाला त्याची नजर श्रेयाला शोधत होती. पण लांबलचक पसरलेल्या समुद्रकिनाऱ्यावर श्रेया त्याला कुठेच दिसली नाही. बऱ्याच वेळ त्याने तिची वाट पाहिली, आणि निराश मनाने तो परत हॉटेलवर परतला. Cafeteria, Lawns, Garden श्रेयाचा कुठेच पत्ता नव्हता. रूम मधून त्याने परत एकदा intercom वरून फोन लावून पाहिला.. but No Answer. कदाचित लवकर उठून मार्केट मध्ये गेली असेल असाही एक विचार त्याच्या मनात चमकून गेला. म्हणजे Reception वर रूमची चावी ठेवली असेल आणि कदाचित तिकडे कुणाला माहीत असेल म्हणून निखिल Reception वर गेला. आजूबाजूला कुणी नाही याची खात्री करून निखीलने दबक्या आवाजातच विचारले, "Room no. 602, May i Know if Miss Shreya is in?'. काउंटर वरच्या माणसाने आपल्या खणातील किल्ल्यांमध्ये शोधाशोध केली, पण त्याला काही किल्ली सापडली नाही. तेवढ्यात त्याला काहीतरी आठवले आणी त्याने संगणकावरील रेकॉर्ड बघितले आणी निखीलला म्हणाला, "Sir, Room No. 602, Shreya and her friends checked-out early in the morning."

"What do you mean by checked-out???" निखिल जवळ-जवळ ओरडलाच.
"Sir, they checked-out !! Left the hotel. Any Problem??", Reception वरचा क्लार्क शांतपणे म्हणाला.

निखीलला भोवतालाचे सगळे जग आपल्या भोवती फिरतेय की काय असेच वाटू लागले. "श्रेया असं जाऊच कसे शकते?? आपल्याला काही बोललीच कसे नाही. निदान जाताना एकदा तरी भेटून जायचे." असे आणी अनेक प्रश्न निखिल च्या मनात घोटाळत होते. "आता?? पुढे काय?? ती कुठे भेटणार, कुठे राहते, फोन नं. काहीच कसे आपल्याला माहीत नाही.. श्शी.. आणी म्हणे मी प्रेम करतो." निखिल ला आपल्या वेंधळेपणाची लाज वाटली.

तेवढ्यात निखीलला एक कल्पना सुचली. Reception च्या रजिस्टर मध्ये तर तिची माहिती असणारच. तिची नाही, तर निदान कुणाची तरी असेलच की. आपण कसेही करून तिला कॉन्टाक्ट करू शकू. निखीलचे डोके जरा ताळ्यावर यायला लागले होते. त्याने परत त्या क्लार्क ला विचारले.. "Any contact details??"

"No sir.", तो क्लार्क शांत स्वरात म्हणाला.
"What do you mean by NO?? तुमच्याकडे सगळी नोंद असते ना, बुकींग केल्यावर?" निखीलने स्वतःवर ताबा ठेवत विचारले.
"Yes sir. पण आम्ही Customers ची माहिती शेअर करू शकत नाही. Its against the rules', क्लार्क.
"ओह..! आले लक्षात', असे म्हणून निखीलने आपल्या पाकिटातील शंभराच्या दोन नोटा काढून त्याच्या हातात कोंबल्या, आणी अर्थपूर्ण हास्य केले.
"Sorry sir, please take this back. Its against the ethics, and its against the rules. I can't give you the information", आणी क्लार्क ने त्या नोटा निखिल कडे परत केल्या.
निखीलने हात जोडले, पाया पडला, शांतपणे समजून बघितले, ओरडून भांडून पाहिले पण काही उपयोग झाला नाही. निखिल मान खाली घालून मागे वळला, तेवढ्यात त्या क्लार्क ने त्याला हाक मारली. निखिल मागे वळला तेव्हा त्या क्लार्क च्या हातात एक कागद होता.
"तुमच्यासाठी हा निरोप ठेवलाय", कागद पुढे करून क्लार्क म्हणाला.
निखिल ने दोन ढांगांमध्येच धावत जाऊन तो कागद हिसकावून घेतला आणि वाचायला सुरुवात केली.

"दिन तो गुजर गये युं ही,
रात भी ढल गयी है..
कोशीश तो बहोत की दिल ने
पर जुबांपे बात रहे गयी युं ही."

हाय निखिल, कसा आहेस?? चिडलास ना माझ्यावर न सांगता गेले म्हणून? एकदा तरी भेटायला पाहीजे होते ना?? मलाही असेच वाटत होते. खूप वाटलं तुला भेटावे, तुझ्याशी बोलावे. पण मनाला खूप समजावले आणि न भेटताच गेले. खूप प्रेम करतोस का रे माझ्यावर?? हो ना?? असा दचकू नकोस. मी न कळण्याइतपत बुद्दू नाहीये? खूप इच्छा होती तुझ्या तोंडून ऐकायची. पण आयुष्याने इतक्या जखमा दिल्यात की आता प्रत्येक गोष्ट करताना हात मागे होतो. प्रेम, नाती या गोष्टींमधला खरं सांग तर माझा विश्वासच उडाला आहे. अर्थात एक नातं खोटं निघालं म्हणजे सगळीच नाती खोटी, फसवी असतील असं नक्कीच नाही. आठवतं निखिल आपली भेट कशी झाली. एक छोटास्सा अपघातच नाही का? मग अश्या अपघातानेच झालेल्या भेटी, त्यामुळे निर्माण झालेले प्रेम यावर विश्वास कसा ठेवायचा? कसं म्हणायचं की नियतीने आपल्याला एकत्र आणले ते आयुष्यभर एकत्र राहण्यासाठीच?? आज एका अपघाताने आपण एकत्र आलो.. कशावरून उद्या दुसऱ्या एखाद्या कारणाने आपण वेगळे होणार नाही?? खु ss प दुःख होतं निखिल जेव्हा एखादं नातं तुटत, जेव्हा आपण एखाद्या "आपल्या" पासून दूर जातो.

Anyways, कदाचित तुला मी हे काय बडबडतीये हे पटणार नाही. कदाचित तू माझ्यावर प्रेम करतही नसशील. माझाच तसा गैरसमज झाला असेल. पण निखिल मी करते.. मी तुझ्यावर खूप प्रेम करते. मला तू खुssप आवडलास आणि आवडतोस. तुझी आयुष्यभराची साथ मला नक्कीच आवडेल. पण त्यासाठी आपल्याला एका परीक्षेतून जावे लागेल. त्यासाठी नियतीला परीक्षेतून जावे लागेल. जर खरंच आपण एकमेकांसाठी बनलेलो असलो, तर उद्या नियती परत आपली भेट नक्कीच घडवून आणेल. माझा विश्वास आहे, निखिल परत आपण नक्कीच भेटू. कधी, कुठे, केव्हा ते नाही सांगता येणार, पण भेटू हे नक्की.

परीक्षेत कॉपी करतात ना, तशीच एक कॉपी मी करते आहे. जाताना Reception वरच्या क्लार्क ला मी ५० रुपयाची टीप दिली आहे, आणि त्या नोटेच्या मागच्या बाजूस मी माझा मोबाईल नंबर लिहिला आहे. बघ. आपल्या नशिबात असेल तर ती नोट त्याच्याकडे असेलही. तुला माझा मोबाईल नंबर मिळेलही. आणी परत आपण एकदा, आणि कायमचेच भेटू शकू. काय माहीत आपल्या नशिबात काय आहे. पण तो पर्यंत आपल्याला दूर राहावेच लागेल.

युं तो कोई तनहा नहीं होता,
चाह कर भी कोई जुदा नही होता,
मोहब्बत को तो मजबुरीयां ही ले डुबती है,
वरना खुशीं से कोइ बेवफा नही होता.

बाय निखिल, काळजी घे. नशिबात असेल तर आपण परत भेटूच.

फक्त तुझीच,
श्रेया.
“
निखीलला हसावे का रडावे काहीच कळत नव्हते. श्रेया आपल्यावर प्रेम करते हे ऐकून आनंदी व्हावे का असल्या अगम्य परीक्षेबद्दल वाचून रडावे. अचानक त्याला ५० रु.ची आठवण झाली त्याने त्या क्लार्क ला विचारले की श्रेया ने दिलेली ५० रु.ची नोट आहे का?? पहिल्यांदा त्याला निखीलला टीप बद्दल कसे कळले आणी ती नोट त्याला का हवी आहे, हेच कळेना. मग त्याने आपले सगळे खिसे शोधले पण ती नोट कुठेच सापडेना. टेबलचे खण, कॅश-बॉक्स सगळे निखीलने शोधले, पण अशी ५० रु.ची नोट ज्याच्या मागे मोबाईल नंबर लिहिलेला आहे कशी कुठलीच नोट सापडली नाही. अचानक त्या क्लार्क ला आठवले की मगाशी एका customer ला १०० रु सुट्टे हवे होते तेव्हा त्याने ५०-५०रू दिले होते, त्यात त्याने एक नोट आपल्या खिशातून काढून दिली होती. झाले आता कुठल्या customer ला दिली, त्याने बाहेर जाऊन कुठे खर्च केले असतील, तिथून पुढे ती नोट कुठे गेली असेल?? निखिल ला आपण नशिबापुढे किती helpless आहोत याची प्रकर्षाने जाणीव झाली.

पहिल्या पावसाची नुकतीच सुरुवात झाली होती. मुसळधार पाऊस कोसळत होता. निखिल तिथेच एका दगडावर श्रेयाने लिहिलेला कागद छातीशी घट्ट कवटाळून बसला होता. त्याच्या चेहऱ्यावरून पाण्याचे थेंब ओघळत होते. आता ते थेंब पावसाचे होते का डोळ्यांतून वाहणाऱ्या पाण्याचे ते एक तर निखीललाच माहीत किंवा त्या नशिबाला.

तीन वर्षांनंतर……

"निखील ss, ए निखील. .", अनुने निखीलला हाक मारली. "काय रे एवढी घाई आहे तुला? जरा हळु चाल की."
"मी हळुच चालतोय. तुच शंभर ठिकाणी थांबतेस window shopping करायला." निखील काहीश्या नाराजीच्या सुरात म्हणाला.
"How unromantic! तुझ्याबरोबर माझ्यासारखी एक सुंदर, सुशील मुलगी Shopping करायला आली आहे, आणी तु आहेस की त्याची तुला काही पर्वाच नाही. ए ss सवय करुन घे हा ss लग्नानंतर तुलाच घेउन मी shopping करणार आहे. तेव्हा तुझी ही कुरकुर चालणार नाही." अनु लाडक्या रागाने म्हणाली. आज अनु खुप खुश होती. फारसे आढेवेढे न घेता निखील shopping ला तिच्याबरोबर आला होता. Shopping पेक्षा निखील तिच्याबरोबर आला होता हेच तिला खुप होते.

लग्नाचा विषय निघताच निखील म्हणाला, "Anu ! Please don't start it again."

"ठिक आहे बाबा !", अनु समजुतीच्या स्वरात म्हणाली. "नाही काढत लग्नाचा विषय बाssस?. पण एकच प्रश्न. माझ्या घरच्यांना तु पसंत आहेस, तुझ्या घरच्यांना मी. मला तु.. आणी...I hope तुला मी. मग प्रॉब्लेम काय आहे. अजुन किती दिवस वाट पहाणार आहेस तु श्रेयाची? सगळेजण तुझ्याच होकाराची वाट पहात आहेत. माझ्याशी लग्न करं.. तुझ्यावर इतके प्रेम करीन की तुला परत कध्धीच श्रेयाची आठवण येणार नाही."

"अनु..! तुला कसे समजवु तेच मला कळत नाही बघ." निखील हताश स्वरात म्हणाला. "हे बघ अनु. आपण दोघेही एकमेकांना लहानपणापासुन ओळखतो. आपण एकमेकांचे चांगले मित्र होतो.. आहोत आणी यापुढेही राहुच. मग हे लग्न, प्रेम सगळे मध्ये कशाला? मला तु आवडतीस, नक्कीच आवडतीस. किंबहुना श्रेयापेक्षाही जास्ती. फक्त त्या आवडण्यामागच्या भावना वेगळ्या आहेत. तु म्हणतेस कदाचीत तसे होईलही. कदाचीत आपले लग्न होईलही. कदाचीत मी तुझ्यात इतका involve होईन की मला श्रेयाची आठवणही होणार नाही. पण हे सगळे कदाचीत आहे. तीन वर्ष झाली पण मी अजुनही श्रेया ला विसरू शकलो नाही. अजुनही प्रत्येक पन्नास रुपयाची नोट मी दहा वेळा उलटुन पालटुन बघतो. चार-पाच वेळा मी अलिबागलाही जाउन आलो. कदाचीत ती नोट अजुनही तिथेच कुणाकडे तरी असेल. तिथल्याच कुठल्यातरी दुकानात, रिक्षावाला, नारळ-पाणीवाला, घोडा-गाडी वाला, मंडई...!!"

"कशी होती रे श्रेया, माझ्यापेक्षाही सुंदर होती का?", निखीलचे वाक्य तोडत अनु खिन्न मनाने म्हणाली.
"होती नाही अनु, आहे म्हण. श्रेया आहे.. जगाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात, कुठेतरी नक्कीच आहे, माझी वाट बघत आहे. आणी मी तिला शोधुन काढीन." निखीलच्या मनातील आशावाद अजुनही तितकाच जागा होता. निखील तिथल्याच एका दुकानात घुसला. त्याने आपल्या खिशातील शंभराची नोट पुढे केली आणी दुकानदाराला म्हणला, "भैय्या, सौ का दो पचास छुट्टा है?" दुकानदाराने त्याला पन्नास च्या दोन नोटा दिल्या आणी निखील त्या नोटा उलट्यापालट्या करुन श्रेयाचा मोबाईल नंबर शोधु लागला.

"रेडीओ मिर्ची, ९८.३ FM".
श्रेया बिछान्यावर पडल्यापडल्या रेडीओवर गाणी ऐकत होती. गेली तीन वर्ष तिच्या मनात चालु असलेला गोंधळ अजुनही संपला नव्हता. तिचे एक मन पश्चाताप करत होते. तिच्या मुर्खपणाबद्दल तिलाच नावं ठेवत होते, तर दुसरे मनं तिच्या वागण्याचे समर्थन करत होते. नशिबावर विश्वास ठेवायला भाग पाडत होते. हा तीन वर्षाचा काळ श्रेयासाठी फारच दुःखदायक होता. आई-वडील वेगळे झाल्यावर श्रेया एकटीच पडली होती. त्यातच निखीलचा विचार तिला तिच्या एकटेपणाची जाणीव करुन देत होता. श्रेयाने मुंबई सोडुन पुण्यातील एका

कंपनीत नोकरी पत्करली होती आणी पुण्यातच ती एका मैत्रिणीबरोबर रुम शेअर करुन रहात होती.
“आप सुन रहे है Love-bytes, और मै हुं आपका मिर्ची man अनिरुध्द. मुझे कॉल किजीये और मुझे बताईये आपकी Love-life. कॉल किजीये ६६०२०९२९. सुनते रहीये, कानोंको मिर्ची लगाते रहीये. Radio Mirchi Its Hot.” रेडीओ वर गाणी लागत होती. निरनिराळे लोक आपले चित्र-विचित्र प्रश्न, प्रॉब्लेम्स फोन करुन सांगत होते. श्रेयाच्या मनात विचार आला, आपणही फोन केला तर. तेवढाच वेळ जाईल.
श्रेयाने आपला मोबाईल उचलला आणि नंबर फिरवला.
RJ अनिरुद्धने नविन फोन येतो आहे हे आपल्या पॅनलवर पाहीले आणि तो म्हणाला, “चलो देखते है Who is our next Caller. Hello?”

निखील अनुबरोबर shopping संपवुन कारमधुन घरी परतत होता. रेडीओ वर चाललेली कंटाळवाणी आणी निरर्थक बडबडीचा त्याला फार कंटाळा आला होता. अनिरुध्दचे, “चलो देखते है Who is our next Caller. Hello?” हे वाक्य त्याने ऐकले आणी म्हणाला, “आधीच आयुष्यात problems काय कमी आहेत, की यांचे problems ऐका. काय कंटाळवाणा कार्यक्रम चालु आहे” असे म्हणुन त्याने रेडीओ बंद केला आणी CDPlayer चालु केला.”

निखील काही सेकंद अजुन थांबला असता तर कदाचीत त्याने श्रेयाचा आवाज ऐकला असता, तिचा ठावठिकाणा त्याला कळला असता. पण कदाचीत नशीबाला अजुन हे मान्य नव्हते.

****************************************************

१२ नोव्हेंबर, निखील आणी अनुची Engagement ची तारीख ठरली होती. निखील च्या मागे लागुन-लागुन सगळ्यांनी त्याची संमती मिळवली होती. निखील पुर्णपणे खुश नव्हता, पण त्याच्यापुढे दुसरा पर्यायही उरला नव्हता. नशिबाचा कौलच नाही असे समजुन त्यानेही शेवटी होकार दिला होता.

आज निखील आणी अनु एका मोठ्या मॉल मध्ये Engagement ची खरेदी करायला गेले होते. X-mas जवळ आल्याने मॉलही पुर्ण सजले होते. विविध ठिकाणी Sale, Discounts लागले होते. अनुला तर काय घेउ आणी कित्ती घेउ असेच झाले होते. तिने स्वतःची खरेदी तर केलीच होती पण निखीलसाठीचे कपडे, वस्तु वगैरे पण तिनेच पसंत केले होते. निखील चेहऱ्याव आनंद आणायचा प्रयत्न करत होता. पण मनामध्ये मात्र त्याचा आक्रोश चालुच होता. मनातल्या मनातच निखीलचे मन म्हणत होतेः
” अश्कोंको हमने कई बार रोका,
फिर भी जाने क्यों आंखे धोका दे गयी,
भरोंसा तो था हमें अपने आप पर मगर,
उनकी यांद आंतेही ना जाने क्युं पलकें नम हो गयी”.

खरेदी संपवुन निखील आणी अनु खाली पार्कींग मध्ये गाडीत सामान भरत होते, एवढ्यात, निखील ला कोणीतरी जोर-जोरात हाक मारतेय असा भास झाला. निखीलने मागे वळुन पाहिले तेंव्हा त्याच्या ऑफिस मधला मित्र-दिन्या – धावत येताना दिसला.

“अरे काय झाले.. कशाला बोंबलतो आहेस एवढा.. आणी तु इथे काय करतो आहेस?”, दिन्या जवळ येताच निखील ने त्याला विचारले.

“अरे माझे.. सोड.. “, दिन्याला पळाल्यामुळे प्रचंड धाप लागली होती, “श्रेया.. श्रेया..” कसा बसा धापा टाकत निखीलला म्हणाला.

श्रेयाचे नाव ऐकताच निखीलने हातातल्या पिशव्या खाली टाकल्या आणी दिन्याच्या खांद्यांना धरुन त्याला गदा गदा हलवत विचारले.. “अरे काय श्रेया.. काय झाले.. तु मला निट सांगणार आहेस का?”

दिन्या अजुनही धापाच टाकत होता.. “अरे श्रेया, तुझी श्रेया, आपल्याला अलिबागला भेटली होती ती.. वरती आहे. मॉलमध्ये. मी आत्ताच तीला पाहीले.”

प्रचंड शॉक बसावा तसा निखीलला धक्का बसला.. “कुठे.. कुठे आहे.. कुठल्या मजल्यावर??”. निखीलला आपली Engagement ठरली आहे, अनु आपल्या बरोबर आहे याचा जणु विसरच पडला होता. आपली excitement तो लपवु शकत नव्हता. “आणी तु तिला थांबवले का नाहीस??”

“अरे मला नक्की माहीत नाही तिच श्रेया आहे का ते. मी असं कसं कुणाशीही जाऊन बोलणार. तेवढ्यात तु मला दिसलास म्हणलं तुला सांगाव म्हणुन पळत पळत तुझ्या मागे आलो. ती आता नक्की कुठल्या मजल्यावर आहे ते नक्की नाही सांगु शकत. पण बहुदा ६ किंवा ७ वा मजला.”, दिन्या.

पुढचे काही न ऐकता, निखील वेड्यासारखा पळत सुटला. कशीबशी त्याने लिफ्ट गाठली. पण आता जावे कुठल्या मजल्यावर. शेवटी बराच विचार करुन त्याने ७ नंबर दाबला.

इकडे, दिन्या जे म्हणाला होता ते खरंच होते. श्रेया आपल्या मैत्रिणीबरोबर त्याच मॉलमध्ये shopping करायला आली होती, आणी नुकतीच खरेदी संपवुन घरी जायला निघाली होती. दोघींचे ही हात पिशव्यांमध्ये व्यापलेले होते आणी दोघीही ७ व्या मजल्यावरच्या लिफ्टच्या समोर लिफ्ट येण्याची वाट बघत उभ्या होत्या.

निखीलही त्याच लिफ्टने वरती येत होता. ७व्या मजल्यावर लिफ्ट थांबल्यावर दार उघडल्यावर दोघेही समोरासमोरच आले असते. एकमेकांची भेट झाली असती. पण नशीबाला हे ही कदाचीत मान्य नव्हते.

निखीलची लिफ्ट तिसऱ्या मजल्यावर थांबली. त्यात एक लहान, चेहऱ्यावरुनच उपद्रवी दिसणारा मुलगा आणी त्याचे आई-वडिल घुसले. त्या मुलाला लिफ्टचे फारच आकर्षण होते. आत घुसल्या घुसल्या त्याने लिफ्टची सगळी बटण दाबली. त्याचा परीणाम असा झाला की निखीलची लिफ्ट सरळ ७व्या मजल्यावर न थांबता ४-५-६ अश्या सगळ्या मजल्यांवर थांबत गेली. निखीलला तर त्या मुलाला खाऊ-का-गिळु असे झाले होते. वरती श्रेया आणी तिची मैत्रीण या सारख्या थांबत येणाऱ्या लिफ्ट ला बघुन वैतागल्या होत्या. तेवढ्यात शेजारची लिफ्ट आलेली पाहुन श्रेया आणी तिची मैत्रीण तिकडे गेल्या. श्रेया त्या लिफ्ट मध्ये जायला, आणी इकडे निखीलची लिफ्ट ७व्या मजल्यावर थांबायला एकच वेळ झाली. नशीबाने निखीलला पुन्हा एकदा हुलकावणी दिली होती.

निखीलने पुर्ण ७वा मजला उलथुन काढला पण श्रेयाचा कुठेच पत्ता नव्हता. त्याने बाकीचे मजलेही सगळे पालथे घातले पण तोपर्यंत श्रेया निघुन गेली होती.

निखील तेथेच डोके धरुन खाली बसला.

इकडे श्रेया आणी तिची मैत्रीण पार्कींग मध्ये आले. आपले सगळे सामान गाडीमध्ये भरले आणी गेटपाशी आल्या. श्रेयाने Parking Charges देण्यासाठी पैसे दिले, पण तिथल्या watchman कडे सुट्टे पैसेच नव्हते. आणी श्रेयाकडे तर सगळे बंदेच होते. श्रेयाने वैतागुन इकडे-तिकडे पाहीले. तिला कोपऱ्यात एक मुलगी गाडीपाशी आपले सामान घेउन उभी असलेली दिसली. श्रेया आपल्या गाडीतुन खाली उतरली आणी तिच्याकडे गेली. आपल्या पर्स मधुन एक नोट काढुन तिला विचारले “You have change?”. समोरची मुलगी कुठेतरी शुन्यात नजर लावुन बसली होती. श्रेयाने आपला घसा साफ करुन पुन्हा विचारले..”Hello..!! You have change?” तशी ती मुलगी भानावर आली.

तिने आपल्या पर्स मध्ये हात घालुन दहा च्या ५ नोटा काढुन श्रेयाच्या हातात दिल्या. श्रेयाने आपली नोट काढुन तिला दिली आणी म्हणाली,

“मी श्रेया.”

समोरची मुलगी तिला जरा मंदच वाटली. किंवा कुठल्यातरी धक्यात असलेली. थोड्यावेळाने तिनेही आपला हात पुढे केला आणी म्हणाली. “अनु!!’

श्रेया फार काही तिच्या नादी लागली नाही.. जाताना, “Thanks Anu” असे म्हणुन आपल्या गाडीत जाउन बसली. Parking चे पैसे दिल्यावर श्रेया आणी तिची मैत्रीण निघुन गेल्या.

थोड्यावेळाने अनु भानावर आली. तिचा आता पुर्ण विश्वास बसला होता की निखील अजुनही श्रेयाला विसरू शकलेला नाही. आणी उद्या जरी आपले लग्न झाले तरीही तो कधीच श्रेयाला विसरू शकणार नाही. आणी समजा आत्ताच निखीलला श्रेया भेटली तर??? आणी अचानक तिला आठवण झाली त्या मुलीची जिला तिने सुट्टे पैसे दिले होते.. काय नाव सांगीतले तिने स्वतःचे?? नेहा कि श्रेया??

अनुनेचे लक्ष आपल्या हाताकडे गेले. तिच्या हातात अजुनही श्रेयाने दिलेली नोट होती. धकधकत्या अंतःकरणाने श्रेयाने ती नोट उलगडली, आणी तिला नोटेच्या मागच्या बाजुवर लिहीलेले दिसलेः श्रेया – ९२९४२-२३४३६. अनुचे डोळे विस्फारले गेले. आपण जे बघतो आहे ते खरं आहे का भ्रम आहे, का दिवा स्वप्न हेच तिला कळेनासे झाले. निखीलचे आयुष्य, तिचे आयुष्य आणी श्रेयाचे आयुष्य सगळे अनुवर अवलंबुन झाले होते. श्रेयाच्या हातात ती नोट होती जी निखील गेली तीन वर्ष वेड्यासारखी शोधत होता. निखील, तिचा जिवाभावाचा निखील, तिचा होणारा नवरा, ज्याच्याबरोबर संसार करण्याची तिने स्वप्न पाहीली होती तोच निखील. अनुने ही नोट त्याला दिली तर?? तर त्याला किती आनंद होईल. त्याची आणी श्रेयाची भेट होईल. अनुचे उपकार निखील कध्धीच विसरू शकणार नाही. पण.. पण अनुचे काय? श्रेयाची भेट झाल्यावर निखील अनुशी लग्न करेल? मग तिच्या स्वप्नांचे

काय? ती स्वप्न काय अशीच विखरुन द्यायची. काय झालं जर मी ही नोट निखीलला दाखवलीच नाही तरं. त्याला कसं कळणार आहे? १०-१२ दिवसांत आपली engagement तर होईलच, लग्नही होउन जाईल.

अनुच्या मनात कालवाकालव झाली होती. काय करावे, काय करु नये हेच ठरत नव्हते. आपल्या स्वार्थासाठी ज्याच्यावर आपण प्रेम करतो त्याला मिळवण्यासाठी असा खोटेपणाचा आधार घ्यायचा.. नाही. अनुला हे पटत नव्हते. जेव्हा आपण निखीलवर प्रेम करायला लागलो, तेव्हा निखीलनेही आपल्यावर प्रेम करावे असा आपला आग्रह कधीच नव्हता. श्रेया निघुन गेल्यावर तो तुटुन जाउ नये, कोलमोडुन जाउ नये म्हणुनच आपले प्रेम आपण त्याच्याकडे व्यक्त केले, त्याला आपला आधार देउ केला. मग जेंव्हा श्रेया त्याच्या आयुष्यात येउ शकते आहे, तर नशीबाचा हा निर्णय बदलणारी मी कोण??

निखील पार्कींग मध्ये आला तेंव्हा त्याला अनु कुठेच दिसली नाही. त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. अनु असताना आपण जे वागलो तसे वागायला नको होते. पण श्रेया भेटणार म्हणल्यावर आपला आपल्या मनावर ताबाच राहीला नाही त्याला तरी कोण काय करणार. आता घरी गेल्यावर अनुला भेटुन तिची माफी मागायची असेच निखीलने मनोमन ठरवुन टाकले. तेवढ्यात तेथील watchman निखील पाशी आला आणी म्हणाला. “वो मेमशाब ने आपके लिये ये लिफाफा छोडा है.”

निखीलने तो लिफाफा उघडला. आत मध्ये एक चिठ्ठी होती :
“साथ हमारा पल भर का सही,
पर वोह पल जैसे कोई कल ही नही,
रहे जिंदगी मै शायद फिर मिलना हमारा,
लेकीन महकता रहेगा दिल मै हमेशा प्यार तुम्हारा”

चिठ्ठीच्या मागे एक ५०रू.ची नोट होती. निखीलला याचा काहीच अर्थ कळेना. त्याने सहजच सवयीने ती नोट उलटी केली आणी त्याला सगळा अर्थ उमगला. श्रेयाचा नंबर त्या नोटेच्या मागे लिहीलेला होता.

****************************************************

श्रेया नुकतीच घरी परतली होती. जेवण करुन एक डुलकी काढावी असा विचार करत असतानाच तिचा मोबाईल वाजला.

“Hello?”, श्रेया.
” आंखे खुली हो तो चेहरा तुम्हारा हो,
आंखे बंद हो तो सपना तुम्हारा हो,
मुझे मौत का ड़र भी ना हो,
अगर कफन की जगह, दुपट्टा तुम्हारा हो.”, निखीलने तेव्हा ठरवलेला तो शेर म्हणला.
“Who is it?”, श्रेया.
“निखील.”, निखील

श्रेयाला काही क्षण सगळे जग आपल्या भोवती फिरते आहे असेच वाटले. तिला काही क्षण विश्वासच बसेना. दोघेही काही क्षण फोन वर स्तब्ध होते. पण दोघांचे मन, आणी ती शांतताच कित्ती तरी शब्द एकमेकांशी बोलत होते.

पुढे काय झाले?? सगळं जसं सिनेमात दाखवतात तसंच. दोघेही जण एकमेकांना भेटले. गळ्यात गळे घालुन आनंदाश्रुंमध्ये भिजले, अनु पुढील शिक्षणाचे कारण सांगुन अमेरीकेला निघुन गेली. निखील-श्रेयाचे लग्न झाले आणी त्यांनी पुढील अनेक वर्ष सुखाने संसार केला.

आता तुम्ही म्हणाल ही कसली गोष्ट. असं कसं शक्य आहे, जी नोट श्रेयाने अलिबागला दिली होती तीच नोट पुण्यात परत श्रेया कडे कशी आली. हा तर सगळा फिल्मी योगायोग मसाला वाटतोय. अहो.. प्रेम हे अंधळे असते आणी वेडेही. प्रेमात पडलेला माणुस कधी काय करेल सांगता येत नाही. त्यातुनच तर ताजमहाल बनला, त्यातुनच तर Romeo-Juliet च्या गोष्टी बनल्या, आणी त्यातुनच तर प्रेमाच्या असंख्य अजरामर कथा समोर आल्या.

आता खरं काय झाले होते ते मी सांगतो. श्रेयासाठी निखील जसा वेडा पिसा झाला होता, तशीच श्रेया ही. तिचा नशीबावर विश्वास होताच, पण त्याच वेळेस तिला कल्पना होती की एकच ती नोट मिळणे म्हणजे जरा जास्तच नशीबाचा खेळ आहे. तिने काय केले माहीती आहे? त्यानंतर तिच्याकडे असणाऱ्या आणी तिला मिळणाऱ्या प्रत्येक नोटेवर तिने तिचा नंबर लिहीला. अशाप्रकारे देशात जी आधी एकच नोट होती ज्यावर श्रेयाचा नंबर होता, त्याऐवजी अश्या कित्तीतरी नोटा चलनात आल्या. अशीच एक नोट श्रेयाने आपल्या पर्स मधुन काढुन अनुला दिली.

मित्रांनो-आणी मैत्रिणींनो, निखील-श्रेयाला एकमेकांना भेटायला तीन वर्ष लागली. नुसते नशीबावर विसंबुन राहु नका. तुमच्या मनातील भावना तुमच्या आवडत्या व्यक्तिसमोर नक्की व्यक्त करा. नशीब नेहमी प्रयत्न करणाऱ्यांचीच साथ देते.

All the BEST.

..*"सेरेंडेपीटी" ह्या चित्रपटापासुन प्रेरणा घेउन*


## प्रतिक्रिया

1. Super says:

मे 5, 2009 at 9:10 सकाळी (Edit)

pan nikhil la kalale ka ki ti not anu ne dili hoti tyala????

प्रत्युत्तर

2. Prasad says:


मे 5, 2009 at 7:15 pm (Edit)

Mala vatate tu hi gost ekhadya producer la pathavavi..i can visualize the hole movie here..

It is really good..keep posting such a gr8 stories..all the best..

Don’t waste your talent in finding bugs..:-)

प्रत्युत्तर

- **अनिकेत** says:

  मे 6, 2009 at 3:44 सकाळी (Edit)

  खरंच रे, मला संधी मिळाली ना लेखक म्हणुन आणि बऱ्यापैकी पैसे मिळत असतील ना, तर कुठलाही विचार न करता मी नोकरीला लाथ मारीन. खुप्पच वैतागवाणे काम असते हे ‘किडे पकडण्याचे’

  सध्यातरी मला अशी काही संधी दिसत नाहीये, त्यामुळे पोट्यापाण्यासाठी करावे लागते बाबा.. ‘मेरे दो टकीये की नोकरी ने मेरा लाखोंका जिवन जाये.. हाय हाय ये मजबुरी…’


  प्रत्युत्तर

  - prawas says:

    मे 12, 2009 at 11:07 pm (Edit)

    “मराठी माणसा जागा हो!!!!”


    आपण् येथेच् तर् मार् खातो..

3. **bhagyashree** says:

मे 7, 2009 at 8:59 pm (Edit)

awdli gosht ! surwaticha to note dene vagere bhag jo ahe na.. tasach kahisa My Sassy girl navachya movie madhe ahe.. its a korean movie.. youtube var milel.. nakki bagh!

प्रत्युत्तर

4. vijay says:

मे 15, 2009 at 12:27 pm (Edit)

Good One

प्रत्युत्तर


5. Shilpa says:

सप्टेंबर 4, 2009 at 4:55 pm (Edit)

its a triangle story so u should clarify 3rd angle also…

ekdam atopati ghetalya sarkhi watli shewati.. baki casting & story 5*

प्रत्युत्तर

6. Madhuri says:

ऑक्टोबर 29, 2009 at 1:16 pm (Edit)

Hi!

Story aawadali. Pan kharech ase kuni waat baghate ka kadhi? unrealistic watate. Aani phakt saat diwasanchya bhetit kase kalate ki wyakti tumchyasathich aahe mhanun? Pan cinemachi story mhanun chalel karan hindi cinemat kahihi hou shakate.

प्रत्युत्तर

7. Vinay says:


नोव्हेंबर 19, 2009 at 6:16 pm (Edit)

Hi story .. serendipity movie chi story aahe .. thodi ferfar vagali tar.

changli aahe ..

pan pratek jan evdha bold nasto ki to swtala express karu shakel… mi ek tyatlach.

प्रत्युत्तर

8.  ruchita redkar says:

जानेवारी 13, 2010 at 2:32 सकाळी (Edit)

heart touching story…but feeling bad for anu…

well wht do u thnk anybody really wait for true love…

not possible in practical life …

its 2.30 a.m. now…


प्रत्युत्तर

9.  Geeta says:

जानेवारी 15, 2010 at 12:21 pm (Edit)

Story khupch chyan aahe pun mala Anu baddal vait vatate premat padleli vaykati premasaathi kharch kahihi karu shakte na

प्रत्युत्तर

10.  ek mulagi says:

जानेवारी 25, 2010 at 5:06 सकाळी (Edit)

liked the story, quite a nice little twist at the end, liked all of your stories . them. and most of all i appreciated your crediting the original movie.

प्रत्युत्तर

11.  asmita says:

फेब्रुवारी 27, 2010 at 4:02 pm (Edit)

khupch chan aahe katha vachatana chitrach samor yet aahe aani tyamadhe me eka parach aahe aasach vatat hot mala navin katha post kara


प्रत्युत्तर

12.  pratibha says:

फेब्रुवारी 27, 2010 at 5:30 pm (Edit)

nice, khup avadli mala gosht, ekdam mastch


प्रत्युत्तर

13.  rupam says:

एप्रिल 11, 2010 at 12:49 सकाळी (Edit)

The story matches very much to movie called serendipity.& it cant be coincidence.

प्रत्युत्तर


1.  rajanikant says:

*मे 14, 2010 at 9:47 सकाळी_ (Edit)*

wa.. khup chan..

aniket khup chan lihtos re…….

प्रत्युत्तर


2.  *नागेश*_says:

*जून 29, 2010 at 10:36 सकाळी_ (Edit)*

खूप छान आहे ……… लिहिण्याची शैली अत्यंत सुंदर आहे………

all the best

प्रत्युत्तर

3.  *nagesh*_says:

*जुलै 12, 2010 at 10:52 सकाळी_ (Edit)*

अनिकेत तुझ्यासाठी एक चांगली बातमी आणि एक वाईट बातमी :

चांगली हि कि नवीन चित्रपट मिलेंगे मिलेंगे तुझी कथा "तुझी नि माझी प्रीती " शी तंतोतंत मेल खाते

वाईट हि कि तुला कथाकार म्हणून डिरेक्टरने नही विचारलं …………..

प्रत्युत्तर

○  ***अनिकेत***_says:


*जुलै 12, 2010 at 11:19 सकाळी_ (Edit)*

त्याचे कारण असं की माझी ही गोष्ट “सेरेंडेपीटी” ह्या चित्रपटापासुन प्रेरणा घेउन लिहीण्यात आलेली आहे. अर्थात दोन्ही गोष्टी वेगवेगळ्याच आहेत फक्त ती ५०रु.च्या नोटेची गोष्ट समान आहे.

पण “मिलेंगे मिलेंगे” हा चित्रपट सिन-टु-सिन त्या चित्रपटावर बेतलेला असावा असे एकुण चित्रपटाचे कथानक वाचुन वाटते.

-----------------------------------------------------------------

प्रत्युत्तर

4.  *Vikas Adhav* says:

जुलै *15, 2010 at 12:00 pm (Edit)*

Hello Aniket Sir,

Minde Blowing, Jaha Pana Tusi Great Ho Tofu kabul karo!!!

प्रत्युत्तर

5.  *SUPRIYA* says:

जुलै *29, 2010 at 12:33 pm (Edit)*

mala katha mhanun wachayala khup avadali ankhi asha stories wachayala sudha avadel mala.

thank you.